ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें. वर्गणीचे दर : वार्षिक : ६ रु. सहामाही : ३ रु. किरकोळ : २ आ. दुर्गाविलास, पुणें ४.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT

वर्ष १९ . पुणें, बुधवार तारीख १७ जून, १९५३ अंक १४

## विविध माहिती

**सिनेतंत्रज्ञ बेकार**—हॉलिवुडमधील सिनेमाच्या धंद्यांतील ५० टक्के तंत्रज्ञ बेकार आहेत. बहुतेक कंपन्यांनीं परदेशांत चित्रपट काढण्यास सुरवात केल्यामुळें हा प्रसंग ओढवला आहे, असें समजतें. सध्यां ९५ चित्रपट परदेशीं काढण्यांत येत आहेत. ह्याशिवाय, बरेच परकीय बोलपट अमेरिकेंत दाखविण्यांत येत असल्याचाहि तो परिणाम आहे.

**धान्य पिकविण्याची मोहीम**—भारतीय सरकारनें दिल्ली राज्य सरकारला अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेला मदत म्हणून १२,६८,००० रुपये मंजूर केले आहेत. त्यांपैकीं ९,६७,००० रुपये कर्जाऊ देण्यांत आले असून बाकीचे मदत म्हणून देण्यांत आले आहेत. २,२८,९०० रुपये विखुरलेल्या जमिनीच्या एकीकरणासाठीं राखून ठेवण्यांत आले आहेत.

**खाणी-मजुरांना वैद्यकीय मदत**—झरिआ जवळील मुग्मा येथील दवाखान्याला जोडून एक इस्पितळ चालविण्याचें खाणी-मजुरांच्या आरोग्याबद्दल सल्ला देणाऱ्या कमिटीनें ठरविलें आहे. ह्या कामासाठीं ४,६७,००० रुपये भांडवली खर्च येईल आणि शिवाय दरवर्षी ७२,००० रुपये खर्च करावे लागतील. इटकी येथील आरोग्यगृहांत १० रोगी खाणी-मजुरांची सोय करण्यांत येणार आहे.

**आठवड्यांतून एक दिवस आंधळा**—सिंधमधील यदा ह्या गांवीं अझीम नांवाचा एक माणूस आहे, तो आंधळा आहे. पण चमत्कार असा कीं, तो दर गुरुवारीं संध्याकाळपासून शुक्रवारीं संध्याकाळपर्यंत फक्त एकच दिवस आंधळा होतो. अझीमचें वय ६० असून हा प्रकार गेलीं तीस वर्षें चालू आहे, असें त्याची माहिती असणारे लोक सांगतात.

**नारळांच्या कलमांचें केंद्र**— कुमठा येथील नारळांचीं कलमें करणारें केंद्र आणखी पांच वर्षें चालू ठेवण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. हें केंद्र १९४८ सालीं स्थापन झालें. दरवर्षी १०,००० नारळाचीं रोपें तें पुरवीत असे; आतां दरवर्षी १५,००० रोपें तयार करण्यांत यावयाचीं आहेत.

**मॅग्नेटाइटचें उत्पादन**—मद्रास राज्यांत सालेम येथें मॅग्नेटाइटच्या खाणी आहेत. ह्या खाणींचें उत्पादन वाढविण्यासाठीं एक जपानी कंपनी तंत्रज्ञ व यंत्रसाहित्य पुरविणार आहे, असें समजतें. दर महिना १,००० टनांपेक्षा अधिक उत्पादन करून तें जपानला निर्यात करण्यांत येणार आहे.

**फिलिपाइन्समध्यें युरेनिअम**—फिलिपाईन बेटांत युरेनिअमची माती सांपडण्याचा संभव असल्यानें अमेरिकेच्या ॲटॉमिक एनर्जी कमिशनतर्फे दोन भूगर्भशास्त्रज्ञ लवकरच फिलिपाइन्स बेटांची भूस्तरविषयक तपासणी करण्यासाठीं जाणार आहेत.

**बेत रद्द झाला**—भारतीय सरकार अलिपूर येथील टांकसाळींत चांदी गाळण्याचा एक कारखाना काढणार होतें. परंतु आतां हा विचार सोडून देण्यांत आला असल्याचें समजतें.

**कैदी मदत करणार**—उत्तर-प्रदेशांतील विकास योजनांच्या कामांत कैद्यांचें अधिक साह्य घेण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे. चंद्रप्रभा धरणावर राज्याच्या तुरुंगांतील २,१०० कैदी काम करीत आहेतच. त्यांतच दीर्घ मुदतीच्या शिक्षा झालेल्या ९०० कैद्यांची आणखी भर पडणार आहे.

**दारूच्या जाहिराती**—लाहोर शहराच्या ज्या भागांत दारू पिण्यास बंदी आहे. त्या भागांत फिरणाऱ्या बसेसवर दारूच्या जाहिराती लावण्याचें बंद करण्यांत आलें आहे.

**शिकॅगो येथील रेल्वेची रहदारी**—अमेरिकेंतील इलिनॉइस ह्या संस्थानांत असलेलें शिकॅगो हें शहर रेल्वेचें एक फार मोठें केंद्र आहे. शिकॅगो स्टेशनच्या आवारांतून रोज उतारूंच्या १,७०० व मालवाहू ९,४०० गाड्या निघतात अगर तेथें येतात. शिकॅगो शहराच्या विभागांतच सुमारें ८,००० मैलांचा रेल्वेचा रस्ता आहे.

**हौशी ब्रिटिश प्रवासी**—चालू वर्षी ब्रिटनमधून ६,५०,००० हौशी प्रवासी युरोप खंडांत प्रवास करण्यास जातील असा अंदाज प्रवाशांची सोय करणाऱ्या कंपन्यांनीं केला आहे. त्यांपैकीं बहुतेक लग्न झालेले आहेत. दर ४० पुरुष प्रवाशांमागें ६० स्त्री-प्रवासी असतात, अशीहि माहिती प्रसिद्ध झाली आहे.

**मध्यवर्ती सरकारची मद्रासला मदत**—भारतीय सरकारनें लोकल डेव्हलपमेंट फंडामधून ४० लाख रुपयांची मदत मद्रास सरकारला मंजूर केली आहे, असें समजतें. त्यांपैकीं १.५४ लाख रुपयांची रक्कम कोविलपट्टी विभागांतील दुष्काळी कामावर खर्च करण्यांत येणार आहे.

**भारतीय नाट्यावरील प्राचीन ग्रंथ**—भारतीय नाट्यावरील एक जुना ताडपत्रावर लिहिलेला ग्रंथ म्हैसूरच्या राजांच्या वाचनालयांत सांपडला आहे. हा ग्रंथ १५८२ सालीं लिहिलेला आहे, असा निर्देश ग्रंथावर करण्यांत आला आहे. ग्रंथ म्हैसूर विद्यापीठातर्फे टीपांसहित प्रकाशित करण्यांत येत आहे.

**द. भारतांत पोलादाचा कारखाना**—भारतीय सरकार आणि जर्मन कारखानदार ह्यांच्यांत द. भारतांत पोलादाचा कारखाना काढण्याबाबत बोलणीं चालली असून तीं बरींच प्रगत झाल्याचें समजतें. कारखाना चालू झाल्यावर त्यांत दरवर्षी ५,००,००० टन पोलाद तयार होईल. कारखान्याच्या भांडवलापैकीं एक तृतीयांश भांडवल भारतीय सरकार उभारणार आहे.

## मिठाचें उत्पादन वाढविण्यासाठी रंगाचा उपयोग

### प्रयोग यशस्वी झाल्यास उत्पादन वाढेल

मुंबई येथील मिठाच्या प्रयोग केंद्रांत सध्यां एका नव्या रंगावर चालू असलेले प्रयोग यशस्वी ठरले, तर नव्या मिठागरांची आवश्यकता निर्माण न होतां मिठाचें उत्पादन पुष्कळच वाढूं शकेल. सूर्यतापानें पाणी आटवून मीठ उत्पादन ज्यांत करण्यांत येतें, त्या मिठागरांचें उत्पादन ३०% वाढूं शकेल. एका ब्रिटिश फर्मनें हा नवीन रंग तयार केला आहे आणि त्याच्या वापराचे प्रयोग चालू आहेत. समुद्राच्या पाण्यांत हा रंग मिसळला, म्हणजे समुद्राच्या नेहमींच्या पाण्यापेक्षा रंगमिश्रित पाणी सूर्याची जास्त उष्णता आकृष्ट करते, आणि त्यामुळें बाष्पीभवनास जोराची चालना मिळते. सूर्याच्या उन्हांतून फक्त ७०% उष्णता समुद्राचें नेहमींचें पाणी आत्मसात करूं शकतें; बाकीची उष्णता वाया जाते. परंतु, समुद्राच्या पाण्यांत रंग मिसळला म्हणजे हें मिश्रण परावर्तनास अक्षम ठरतें आणि उन्हांतील बहुतेक सर्व उष्णता तें शोषून घेतें. सहाजीकच, पाण्याचें मीठ बनण्यास कमी वेळ पुरतो.

### मीठ बनविण्याची कृति

[ "क्लोराइड" या समुद्राच्या पाण्यांतील क्षारापासून मीठ तयार करण्यांत येतें. अक्टोबर १५ ते जून १५ पर्यंत म्हणजे पाऊस लागेपर्यंत याचा हंगाम असतो.

शेतासारखें खणून मेहनत करून कुणग्या तयार करण्यांत येतात. मोठ्या भरतीच्या वेळीं समुद्राचें पाणी मिठागरांत घेतात आणि सुकती येण्यापूर्वी बांध घालून तलावांत पाणी सांठवतात.

बांध घालणें, वाफे तयार करणें, तलावांतून घेतलेलें पाणी व्यवस्थित ठेवणें, कुणग्या तयार करणें इ. कामें बऱ्याच काळजीनें करावीं लागतात.

तळ्यांत घेतलेलें पाणी सूर्यप्रकाशानें गरम झाल्यावर तें सुकण्यासाठी शेजारच्या तापवणी भागांत सोडतात आणि तें दाट होऊं लागतांच कुणग्यांत सोडतात. पाण्याचें तापमान २२° झालें म्हणजे कुणग्यांत मिठाचे कण तयार होऊं लागतात. कुणग्यांतील पाणी वरचेवर लांब काठ्यांनीं ढवळावें लागतें. वारा अनुकूल लागला तर पाणी आपोआपाहि ढवळलें जातें.

कुणग्यांत घेतलेलें पाणी उन्हानें आटत जाऊन जसजसें कमी कमी होत जातें, तसतसा मिठाचा थर बसूं लागतो. तो व्यवस्थितपणें बसला म्हणजे मग हलकेंच मीठ शिंपडून मीठ काढून घेतात.

लांब दांडयाच्या लाकडी फळ्याच्या हत्यारानें मीठ वर काढून मग तें वाळण्यासाठी पसरतात आणि व्यवस्थित सुकलें कीं, मग मिठाचीं पोतीं भरून विक्रीस रवाना होतात.

मिठागर विशेषतः खाडीच्या जवळ असतात. सफेत, पिवळसर व काळसर अशा मिठाच्या तीन जाती आहेत. त्यांत दुसरीच जात विशेष चांगली असते.

महाराष्ट्रांत रत्नागिरी, कुलाबा, ठाणें हे तीन जिल्हे आणि गोव्यांत साष्ट, तिसवाडी, बार्देज हे भाग मिठासाठी विशेष प्रसिद्ध आहेत. भारतांत गोव्याइतकें चवदार मीठ दुसरीकडे नाहीं. ]

र. दि. देसाई, भारतमित्र, जून १९५३.

**DECCAN INSTITUTE OF COMMERCE**
**594 Budhwar Peth, Poona 2.**

Opens for the 1953-54 Session on Monday the 22 June 1953.

Students coached up for G. C. D., L. C. C., D. Com., C. A. (First Part); G. D. C. and A., Dip. I. A., C. A. I. I. B.; Shorthand; Typewriting. Examinations. Morning and Evening classes.

Admission to respective Diploma Courses open to Matriculates, Under-graduates and Graduates.

Prospectus free on application to the Secretary.

१९५० अखेरचें ११ वें यशस्वी मूल्यमापन

१९५० मध्येंही रु. २६५ लाखांवर नवीन विम्याचें पूर्ण काम.

वे स्ट र्न इं डि या

विमा कंपनीनें

आपलें सामर्थ्य, स्थैर्य व सेवा

यासंबंधींची प्रचिती पुन्हां एकवार विमा जगतास आणून दिली आहे.

दर हजारी त्रैवार्षिक बोनस

| हयातींतील पॉलिसी | हयातीनंतरची पॉलिसी |
| --- | --- |
| रु. २७ | रु. ३३ |

कंपनीच्या वाढत्या वैभवांत सहभागी व्हा व सर्वोत्कृष्ट फायद्यासाठी वेस्टर्न इंडियाची निवड करा.

के. वाय. जोशी, बी. ए., एफ. आय. ए.
मॅनेजर

**वेस्टर्न इंडिया लाईफ**
**इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा.**

शाखा कचेरीः— शहर: १७९ बुधवार पेठ, लक्ष्मीरोड, पुणें. कॅंप: केअर-ऑफ क्रेसवेल्स, ईस्ट स्ट्रीट, पुणें-१
फोन नंबर— ३४०२

**दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.**

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

# अर्थ

बुधवार, ता. १७ जून, १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सहकारी चळवळीची असमान प्रगति

भारतांतील सहकारी चळवळीची वाढ सर्व राज्यांत प्रमाणशीर झालेली नाहीं. उदाहरणार्थ, ३० जून, १९५१ रोजीं असलेल्या १,१५,४६२ प्राथमिक पतपेढ्यांपैकीं ५२,४२२ म्हणजे जवळ जवळ ४५·४% मुंबई, मद्रास व उत्तर प्रदेश ह्या तीनच राज्यांत केंद्रित झालेल्या होत्या. सबंध देशांतील अशा पतपेढ्यांच्या येणें कर्जांपैकीं ५८% कर्ज मद्रास आणि मुंबई राज्यांतील पतपेढ्यांकडे येणें होतें. कित्येक राज्यांतून अद्याप राज्य सहकारी बँका स्थापनहि झालेल्या नाहींत. सहकारी जमीन गहाणाच्या बँकांच्या बाबतींत राज्यवार प्रगति अशीच कमी–ज्यास्त आहे. ३० जून, १९५१ अखेर सबंध भारतांत २८६ प्राथमिक लँड मॉर्गेज बँका होत्या, त्यांपैकीं एकट्या मद्रास राज्यांत १२९ होत्या. मध्यवर्ती लँड मॉर्गेज बँकांनीं १३३ लक्ष रुपये कर्जाऊ दिलेले होते, त्यापैकीं ८३ लक्ष रुपये (६२% रक्कम) एकट्या मद्रास को. सें. लँड मॉर्गेज बँकेनें दिलेली होती. मध्यवर्ती लँड मॉर्गेज बँकांच्या एकूण ६७४ लक्ष रुपयांच्या डिबेंचर्सपैकीं एकट्या मद्रासच्या वाट्याची ५०९ लाखांचीं डिबेंचर्स होतीं. निम्म्यापेक्षा ज्यास्त राज्यांतून सहकारी लँड मॉर्गेज बँकिंगची व्यवस्थाच नाहीं. सहकारी चळवळीच्या असमान प्रगतीचें प्रतिबिंब सहकारी चळवळीमध्यें आलेल्या स्थानिक बचतीच्या कमी–अधिक स्वरूपांत दिसून येतें आणि मोठमोठ्या प्रदेशांस सहकारी चळवळीचा फायदा न मिळण्यांत त्याचा परिणाम होतो. रिझर्व्ह बँकेचा प्रयत्न सहकारी पद्धतीनें भांडवल पुरवठ्याची भक्कम पायावर उभारणी व्हावी असा आहे आणि त्या दृष्टीनें श्री. के. माधवदास ह्यांनीं रिझर्व्ह बँकेच्या बुलेटिनच्या ताज्या अंकांत केलेलें विवेचन बोधप्रद आहे.

सहकारी चळवळीच्या दृष्टीनें भारतांतील राज्यांची खालीलप्रमाणें विभागणी त्यांनीं केली आहे:– (१) मद्रास व मुंबई राज्यांत सहकारी चळवळीची प्रगति चांगली झाली आहे. त्या राज्यांच्या सरकारांनीं प्रारंभींपासूनच सतत ह्या चळवळीस उत्तेजन दिलें आहे; बिन–सरकारी व सहकारी कार्यकर्त्यांचें नेतृत्वं चळवळीस लाभलें आहे; देखरेख व नियंत्रण ह्यांची व्यवस्था चांगली आहे आणि सहकारी तत्त्वावर संघटना केल्यापासून होणाऱ्या फायद्यांची जाणीव बऱ्याच लोकांना झालेली आहे. क्रेडिट व नॉन–क्रेडिट हीं दोन्हीं अंगें युद्धकाळांत व युद्धोत्तर काळांत प्रगति पावलीं आहेत. उदाहरणार्थ, पतपेढ्यांचा फायदा मिळत असलेल्या खेड्यांचें व लोकसंख्येचें प्रमाण १९४९ मध्यें अनुक्रमें ४१·४% व १३·८८% होतें; तें १९५० मध्यें ६१·२८% आणि १६·१०% झालें व १९५१ मध्यें तें ६५·५४% व १७.९८% झालें. को-ऑपरेटिव्ह प्लॅनिंग कमिटीनें उद्दिष्ट म्हणून १० वर्षांत ५०% गांवें व ३०% लोकसंख्या ह्यांस प्राथमिक पतपेढ्यांचा उपयोग व्हावा असें सुचविलें आहे, त्यापेक्षा अधिक प्रगति मद्रास व मुंबई ह्या राज्यांत आधींच झाली आहे.

मद्रास राज्यांत पतपेढ्या शेतकऱ्यांस ६¼% दरानें व्याज आकारतात. मुंबई राज्यांत तो दर ७ ११/१६% आहे. हे दोन्ही दर इतर ठिकाणच्या पेक्षा कमी आहेत. अविकासित भागांकडे विशेष लक्ष दिलें जातें. उदाहरणार्थ, मद्रास राज्यांत रायलसीमामधील शेतकऱ्यांना ५% ह्या सवलतीच्या दरानें कर्जें मिळणें शक्य व्हावें म्हणून तेथील सरकार सेंट्रल को. बँकांना सबसिडी देतें. मुंबई राज्यांत अप्रगत विभागांतील पतपेढ्यांना कमी दरानें कर्जें देतां यावींत म्हणून सेक्रेटरींच्या खर्चास मदत व्हावी ह्यासाठीं त्यांच्या खेळत्या भांडवलाच्या ४% पर्यंत सबसिडी देण्याचा रजिस्ट्रारला अधिकार देण्यांत आला आहे; नेहेमीचा दर २½% आहे. कंझ्युमर्स चळवळ, दूधपुरवठा, घरें, औद्योगिक सहकार (विशेषतः विणकरांच्या सोसायट्या), इत्यादि क्षेत्रांत मद्रास व मुंबई ह्यांनीं चांगली प्रगति केली आहे आणि झालेली प्रगति पचनी कशी पाडावयाची व उपलब्ध साधनांच्या मर्यादेंत निर्धास्त वाढीची योजना कशी आखावयाची, हाच महत्त्वाचा प्रश्न ह्या दोन राज्यांतील सरकारी व निमसरकारी कार्यकर्त्यांपुढें आज आहे.

(२) उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, बिहार, ओरिसा, म्हैसूर, त्रावणकोर, कोचीन, हैद्राबाद, इत्यादि 'अ' आणि 'ब' वर्गीय राज्यांतील सहकारी चळवळीची प्रगति मध्यम प्रतीची आहे. त्यांतील कांहीं राज्यांत, विशेषतः दुसऱ्या महायुद्धानंतर, सहकारी चळवळीनें बरीच प्रगति केली असली, तरी त्या चळवळीपुढें महत्त्वाचे कांहीं प्रश्न उभे आहेत. प्राथमिक पतपेढ्यांची रचना, सेंट्रल को. बँकांची भक्कम पायावर उभारणी, अस्तित्वांत असलेल्या बँकांच्या मजबुतींत सर्वांगीण वाढ, लँड मॉर्गेज बँकांची स्थापना, इत्यादि ते प्रश्न होत.

(३) सहकारी चळवळीच्या दृष्टीनें कनिष्ठ प्रतीचीं राज्यें म्हणजे पंजाब, प. बंगाल व आसाम हीं होत. फाळणीपूर्वी पंजाबांत सहकारी चळवळीचें पाऊल बरेंच पुढें पडलेलें होतें. परंतु फाळणीपूर्वी एकदम गोंधळ उडाला व सहकारी संस्थांच्या मोठाल्या रकमा पाकिस्तानांत अडकून पडल्या. बंगालमधील सहकारी चळवळ १९३० च्या मंदीमुळें भाजून निघाली होती; तिला वांचवून सुधारण्याचे अनेक प्रयत्न करण्यांत आले, त्यांत समाधानकारक यश आलें नाहीं. फाळणीमुळें अडचणींत आणखी भरच पडली. सध्याच्या पूर्व बंगालमध्यें राज्य सहकारी बँकेंची येणें कर्जें गोठून गेलीं. आसाममधील परिस्थितीहि अशीच बिकट आहे. मंदीच्या तडाक्यांतून उरली–सुरली चळवळ दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत जवळ जवळ नामशेष झाली. १९४७ सालीं तेथील सरकारनें "ट्रेडिंग को–ऑपरेटिव्हज" चा प्रयोग सुरू केला. सरकारी नियंत्रण व व्यवस्था, एकाच प्रकारच्या बायलॉजची तरतूद, अनेकविध व्यवहारांवर भर, इत्यादि त्यांची वैशिष्ट्यें होतीं. सरकारी लक्ष व पैसा हीं ह्या संस्थांवर केंद्रित झालीं; चळवळीच्या भांडवल–पुरवठ्याच्या अंगाकडे दुर्लक्ष झालें. अपेक्षित यश आलें नाहीं आणि आतां आसाममध्यें कोणत्याच प्रकारची सहकारी चळवळ जिवंतपणाचीं लक्षणें दाखवीत नाहीं.

(४) चवथ्या अनुक्रमाच्या राज्यांचे यादींत सौराष्ट्र, मध्यभारत, राजस्थान, पेप्सु, हिमाचल प्रदेश, त्रिपुरा आणि मणिपूर इत्यादि नवनिर्मित राज्यें येतात. त्यांपैकीं बहुतेकांत सहकारी चळवळ प्राथमिक अवस्थेंत तरी आहे किंवा त्रिपुरा, मणिपूर व कच्छ इत्यादींमध्यें ती अजिबात अस्तित्वांत तरी नाहीं.

## उत्तर-दक्षिण मीटरगेज रेल्वे जोडणार

### खांडवा-हिंगोली फाट्याची योजना

हिंदी रेल्वेज मुख्यतः ब्रॉड व मीटर गेजच्या आहेत. ब्रॉड गेजचे लोहमार्ग एकमेकांशीं जोडलेले आहेत, परंतु उत्तरेकडील व दक्षिणेकडील मीटरगेजचे लोहमार्ग एकमेकांशीं कोठेंहि जोडले गेलेले नाहींत. त्यामुळें मालाच्या वहातुकींत व्यत्यय येतो, मालाची चढउतार करावी लागते, इंजिनें व मालाचे डबे वेगवेगळ्या गेजवरून वहाणें अडचणीचें होतें. उत्तरेकडील मीटरगेजवरील खांडवा हें स्टेशन व दक्षिणेकडील मीटरगेजवरील मनमाड, हिंगोली आणि अदिलाबाद हीं स्टेशनें ह्यांच्यामध्यें २०० मैलांचें अंतर आहे. दक्षिण-उत्तर रेल्वे सांधण्याच्या योजनेच्या इतिहासास १८८२ मध्यें प्रारंभ झाला. अकोला व हिंगोली ह्यांस जोडणारा "बेरार लाइट रेल्वे" नांवाचा फाटा तयार करण्याची कल्पना तेव्हां निघाली. नियोजित फाट्याची लांबी ६२.५ मैल होती. १८९९ मध्यें भारत सरकारनें दक्षिण-उत्तर जोडणाऱ्या फाट्यासाठी पहाणी करविली. खांडवा-वाशीम ह्या फाट्यास १.१६ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज होता. १९०० मधील दुष्काळी परिस्थितींत ह्या विभागांत दुष्काळी कामें सुरू करावीं लागलीं व बांध घालण्यास प्रारंभ झाला, परंतु पुढें त्याबाबतींत कांहींच प्रगति झाली नाहीं. १९०३ सालीं लॉर्ड किचनेर (तेव्हांचे कमांडर इन् चीफ) ह्यांनीं उत्तर-दक्षिण जोडण्याचें लष्करी महत्त्व जोरानें प्रतिपादन केलें. १९११ सालीं प्रत्यक्ष लोहमार्गाची जागा निश्चित झाली. १९२४ व १९२७ सालीं त्या योजनेची पुनः छाननी झाली, परंतु कामाच्या दृष्टीनें, पैशाच्या अभावीं, कांहींच प्रगति होऊं शकली नाहीं.

गेल्या युद्धाचे वेळीं, उत्तर-दक्षिण वहातुकीच्या अडचणी पुनः एकवार स्पष्ट झाल्या. १९४२ मध्यें मेजर जॉन वाइस ह्यांनीं उत्तर-दक्षिण जोडणारे चार दुवे सुचविले. ५-११-१९५१ रोजीं सेंट्रल रेल्वे अस्तित्वांत येऊन, खांडवा व हिंगोली दोन्ही त्या रेल्वेच्या अधिकारांत आलीं. त्यांस जोडणाऱ्या फाट्याची पूर्वतयारी पुनः चालू झाली, आणि चालू वर्षी प्रत्यक्ष कामास प्रारंभ होईल. सुचविलेला मार्ग १८७.२३ मैल लांबीचा असून तो मध्यप्रदेशांतील निमार व अकोला जिल्ह्यांतून व हैद्राबादच्या परभणी जिल्ह्यांतून जाईल. वऱ्हाडच्या अत्यंत सुपीक प्रदेशास लोहमार्ग उपलब्ध होईल. सातपुडा ओलांडण्यासाठी डोंगर तोडावे लागतील व भरी घालाव्या लागतील; त्याचप्रमाणें तापी, पूर्णा व मेणगंगा ह्या नद्यांवर पूल बांधावे लागतील. हा लोहमार्ग चालू झाला म्हणजे अगदी उत्तरेकडील भटिंडा हें अगदी दक्षिणेकडील त्रिवेंद्रम व ट्युटिकोरिन ह्यांस जोडलें जाऊन, गुंटकल व बंगलोर येथील चढउतार वांचेल. कोळशाची वहातुक अधिक सोयीची होऊन वॅगन्समध्येंहि बचत होईल.

## दिल्लींतील राजप्रतिनिधींची वसाहत

दिल्लींतील निरनिराळ्या देशांच्या प्रतिनिधींची एक वेगळीच वसाहत स्थापन करण्यांत येत आहे. ह्या कामाच्या दुसऱ्या टप्प्याला आतां सुरवात झाली असून त्यावर भारतीय सरकार ५० लाख रुपये खर्च करणार आहे असें समजतें. वसाहत किचनेर रोड जवळ उभारण्यांत येत आहे. रस्ते, गटारें, पाणीपुरवठा, इत्यादि सोयी सध्या करून घेण्यांत येत आहेत. हीं सर्व कामें पुरी होण्यास कांहीं महिने लागतील. दोन वर्षांपूर्वी ह्या वसाहतीच्या प्राथमिक अवस्थेवर भारतीय सरकारानें ६५.५ लाख रुपये खर्च केले होते. दिल्लीमधील निरनिराळ्या देशांच्या प्रतिनिधींनीं वसाहतींत जागा घेतलेल्या असून येत्या ऑगस्टच्या सुमारास इमारती बांधण्याच्या कामास प्रत्यक्ष सुरवात होईल असा अंदाज करण्यांत येत आहे. इमारतींमध्यें राहाण्याच्या जागा आणि कचेरींच्या जागा अशा दोन्ही प्रकारच्या बांधण्यांत येणार आहेत. तीन वर्षांपूर्वी प्रथम ही कल्पना निघाली. तेव्हांपासून भारतीय सरकार ह्या परदेशी प्रतिनिधींना सर्व प्रकारची मदत करीत आहे. त्यावेळीं ज्या देशांनीं स्वतःसाठी जागा घेतली त्या देशांत आतां आणखी कांहीं देशांची भर पडली आहे. आतां अमेरिका, जर्मनी, तुर्कस्तान, बेल्जम, इथिओपिआ, इटली, दि व्हॅटिकन, फिनलंड आणि नेपाळ ह्यांनींहि जागेसाठी मागणी केली आहे. भारत सरकारचें परराष्ट्रीय खातें सर्व अर्जांचा विचार करून जागा मापून देण्याच्या कामांत सध्या गुंतलें आहे. कांहीं देशांनीं आपआपल्या इमारती बांधून घेण्यासाठी स्वकीय स्थापत्य शास्त्रज्ञांना मुद्दाम बोलावून घेतले आहे. पण कांहीं देशांनीं भारतीय स्थापत्य शास्त्रज्ञांनाच काम देण्याचें ठरविलें आहे. कॅनडा, फ्रान्स व इराक ह्या देशांना जागा देण्याच्या वाटाघाटी सध्यां चालू आहेत.

## भारतामधील प्लॅस्टिकचा धंदा

ऑल इंडिआ प्लॅस्टिक मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी श्री. जे. एन्. अय्यर हे सदर धंद्याची इंग्लंडमधील परिस्थिति अवलोकन करण्यासाठी इंग्लंडला नुकतेच जाऊन आले. त्यांनीं भारतामधील ह्या धंद्याविषयीं कांहीं उपयुक्त माहिती प्रकट केली आहे. श्री. अय्यर ह्यांच्या मतानें इतर प्रगत देशांत प्लॅस्टिकच्या ज्या दर्जाच्या वस्तू तयार होतात त्याच दर्जाच्या किंवा निदान त्याच्याशीं तुलना होऊं शकणाऱ्या प्लॅस्टिकच्या वस्तू भारतांतहि तयार होतात. भारतामध्यें तयार होणाऱ्या मालाला मध्यपूर्व, पूर्व आफ्रिका, ब्रह्मदेश आणि सीलोन ह्या देशांतून चांगली मागणी आहे. सध्या अशा वस्तू तयार करणारे ८० कारखाने भारतांत आहेत. त्यांपैकीं बहुतेक कारखाने प. बंगाल आणि मुंबई राज्यांत आहेत. सर्व कारखाने मिळून दरवर्षी सुमारे ५ कोटी रुपये किंमतीचा माल तयार करतात. भारत सरकारनें इंग्लंडमधील एका तज्ज्ञ कारागिराचें साह्य मिळविलेलें आहे. साचे कसे तयार करावे ह्या विषयांत सदर तज्ज्ञाचा हातखंडा असून यांत्रिक हत्यारांचा चांगला उपयोग कसा करून घ्यावा हेंहि तो शिकवूं शकेल. प्लॅस्टिकच्या धंद्याला मुख्य कच्चा माल लागतो तो म्हणजे पी. एफ्. ह्या नांवाची पावडर. आपल्याला लागणाऱ्या पावडरपैकीं २५ टक्के पावडर धंदा स्वतःच करूं शकतो. परदेशांतून कच्चा माल आणून त्याच्यापासून कांहीं वस्तू तयार करण्यांत येतात. अशा वस्तूंच्या निर्यातीला सरकारनें रिबेट दिल्यास भारतामधील प्लॅस्टिकच्या पदार्थांच्या किंमती तर कमी होतीलच; पण परदेशी बाजारपेठांत भारतीय माल स्पर्धाहि करूं शकेल.

## सावकारांचे व्यवहार अद्यापहि मोठ्या महत्त्वाचे आहेत

### मुंबई राज्यांतील सावकारी कायद्याची अंमलबजावणी

"दि बॉंबे मनीलेंडर्स ॲक्ट" हा कायदा १९४६ सालीं मंजूर झाला. ३१-७-१९४८ रोजीं मुंबई राज्यांत लायसेन्स घेतलेले ५,२६० सावकार होते. त्यांची संख्या ३१-७-४९ रोजीं ६,६८८ झाली. संस्थानें विलीन झाल्यानंतर ती संख्या ३१-७-५० रोजीं २४,५९२ झाली. त्यापुढील वर्षी ती १७,७४४ वर उतरली. लायसेन्स घेतलेल्या सावकारांची संख्या फार मोठी नाहीं, ह्यावरून बरेच सावकार चोरून सावकारीचा धंदा करीत असले पाहिजेत व कायद्याचीं कलमें टाळीत असले पाहिजेत, असें दिसतें. उदाहरणार्थ, कायद्यास संमत नसलेल्या "ट्रेडर्स" ना कर्जें दिलीं जातात, प्रॉमिसरी नोटांवरील कर्जांस हुंड्यांवरील कर्जांचें स्वरूप दिलें जातें व खरेदी-विक्रीच्या व्यवहारांत व सशर्त खरेदीखतांत सावकारी व्यवहार दडवले जातात.

शेतकऱ्यांची कर्जाची गरज भागविण्याची व्यवस्था (१) तगाई कर्जें (२) सहकारी सोसायट्यांचीं कर्जें व (३) सावकारांचीं कर्जें अशीं आहे. सरकारनें मोठ्या प्रमाणावर तगाईकर्जें देण्यांत बराच धोका असल्यानें अशीं कर्जें आखडतीं घेण्यांत आलीं आहेत. त्यांची रक्कम १९४९-५० मध्यें ४,१३,९०,७५५ रु. होती ती १९५०-५१ मध्यें १,८४,८२,५९३ रु. झाली. सहकारी कर्जासहि स्वाभाविक मर्यादा आहेत. सरय्या कमिटीच्या शिफारसींप्रमाणें, कांहीं विशिष्ट मर्यादित काळांत ३०% लोकसंख्या व ५०% खेडीं सहकारी चळवळींत सामील व्हावीं, अशी अपेक्षा आहे. ह्याचा अर्थ, बहुसंख्य लोकांचें सावकारांवरील अवलंबन कायम रहाणार आहे आणि खेडेगांवीं आर्थिक संसारांत सावकाराचें महत्त्व अटळ आहे. सावकारी कायद्यांतील जाचक नियंत्रणें दूर करून, सावकारांजवळील पैसा खेडेगांवीं जनतेच्या व्यवसायांस अधिकाधिक उपलब्ध करून देण्याची योजना करावी लागेल; रिझर्व्ह बँकेची अखिल भारतीय स्वरूपाची ह्यासंबंधांतील पहाणी त्यास उपयोगी पडेल. सहकारी संस्था व सरकार ह्यांनीं दिलेल्या कर्जांपेक्षा लायसेन्स घेतलेल्या सावकारांनीं (त्यांत बँका व कंपन्या येतात) दिलेलीं कर्जें किती मोठी आहेत, हें खालील तक्त्यावरून दिसून येईल. लायसेन्स न घेतलेल्या सावकारीचे आकडे उपलब्ध नाहींत; ते त्यांत मिळवतां आले तर सावकारीचें महत्त्व अधिकच उठावदार दिसेल.

### ब्रिटनमध्यें दत्तक घेण्याची वाढती पद्धत

ब्रिटनमध्यें मुलें दत्तक घेण्याची प्रथा वाढत चाललेली आहे. १९५० सालीं १३,०३६ मुलांना दत्तक घेण्यांत आलें, तर १९५१ मध्यें १४,१९८ मुलांना दत्तक घेण्यांत आलें. १९४९ मध्यें दत्तक घेण्यांत आलेल्या मुलांच्या संख्येपेक्षा मात्र ही संख्या कमी आहे. ब्रिटनमध्यें अविवाहित मातांना जी मदत करण्यांत येते तीमुळें अशा मातांना आपल्या मुलांचा सांभाळ करणें फारसें जड जात नाहीं. त्यामुळेंच कदाचित दत्तक जाऊं शकणाऱ्या मुलांची संख्या कमी होत चालल्याचें दिसतें. १९४५ सालापासून ब्रिटनमध्यें जन्माला येणाऱ्या बेकायदेशीर मुलांची संख्याही कमी होत चालली आहे. १९५१ मध्यें ११,००० पेक्षा अधिक दत्तक मुलें बेकायदेशीरपणें जन्माला आलेली होती. कांहीं विवाहित जोडपींसुद्धां आपलीं मुलें दत्तक देऊं इच्छितात. ह्याला कारण म्हणून घरांच्या टंचाईकडे बोट दाखविण्यांत येतें. इतर देशांशीं तुलना करतां ब्रिटनमध्यें दत्तकाच्या पद्धतीला कायदेशीर मान्यता मिळण्यास बराच उशीर लागला. १९२६ सालीं दत्तकविधानाला कायदेशीर मान्यता मिळाली. १९५० च्या दत्तकासंबंधींच्या कायद्याप्रमाणें २१ वर्षांच्या आंतील व अविवाहित असणाऱ्या कोणालाही दत्तक घेता येतें. मात्र मूळ ब्रिटनमधील रहिवासी पाहिजे. दत्तक घेणारी व्यक्ती २५ वर्षांपेक्षा अधिक वयाची असली पाहिजे आणि दत्तकांत आणि त्या व्यक्तींत २१ वर्षांचें अंतर असलें पाहिजे. अर्थात दत्तक घेणारी व्यक्ती ब्रिटनची रहिवासी आणि नागरिकहि असली पाहिजे. विवाहित जोडप्यांना संयुक्तपणें दत्तक घेतां येतो. दत्तक घेण्यासंबंधीं केलेला अर्ज कोर्टांत खाजगीरीत्या ऐकला जातो आणि कोर्टाची जर अशी खात्री झाली कीं दत्तकविधान मुलाच्या हिताचें आहे व त्याला आईबापांची संमति मिळालेली आहे, तर कोर्ट दत्तकविधानाला परवानगी देतें व तसा हुकूम काढतें.

---

**अर्जेंटायना-रशिआ व्यापारी करार**—रशिआ आणि अर्जेंटायना ह्या दोन देशांनीं परस्परांशीं व्यापार करण्याचें ठरविलें आहे. व्यापारी करारावर लवकरच सह्या होऊन उभय देश १५,००,००,००० डॉलर्स किंमतीच्या मालाची देवघेव करतील. रशिआशीं अर्जेंटायनाचा हा पहिलाच व्यापारी करार आहे.

**मोटारी चालविणाऱ्या महिला**—अमेरिकेंत सुमारें ६,२२,००,००० जणांच्या स्वतःच्या मालकीच्या मोटारी असून त्यांपैकी १,८६,६०,००० स्त्रिया आहेत. ह्या स्त्रिया स्वतःच आपल्या मोटारी चालवितात. एकूण मोटारवाल्यांचें प्रमाण ३० टक्के आहे.

| मुदत | व्यापाऱ्यांना कर्जें रु. | बिगर-व्यापाऱ्यांना कर्जें रु. | एकूण रु. |
|---|---|---|---|
| १७ नोव्हेंबर ४७ ते ३१ जुलै ४८ | ७,९१,९९,१५७ | ३,००,०७,२७२ | १०,९९,९०,०८५ |
| १ ऑगस्ट ४८ ते ३१ जुलै ४९ | १२,९८,२७,४७० | ४,४१,५१,१६८ | १७,५१,४६,३१५ |
| १ ऑगस्ट ४९ ते ३१ जुलै ५० | २५,९८,४४,६९८ | ९,३०,७२,५६३ | ३५,२९,१७,२६१ |
| १ ऑगस्ट ५० ते ३१ जुलै ५१ | ३०,२७,०५,८८७ | १४,०६,७८,५१९ | ४४,३३,८४,४०६ |
| एकूण | ७७,१५,७५,२१२ | ३०,७९,०९,५२२ | १,०८,१४,३८,६०७ |

## पेन्सिलींच्या कारखान्यांची उत्पादनक्षमता वाढली

### उत्पादनांत मात्र घट

हिंदी पेन्सिलींच्या कारखान्यांची उत्पादनक्षमता ४·५५ लक्ष ग्रोसची ११ लक्ष ग्रोस झाली असली, तरी त्या प्रमाणांत प्रत्यक्ष उत्पादन सुधारलेलें नाहीं. १९५० मध्यें १,१०,६९१ ग्रोस, १९५१ मध्यें २,४२,५४९ ग्रोस व १९५२ मध्यें १,५०,५८९ ग्रोस पेन्सिली हिंदी कारखान्यांनीं तयार केल्या. टारिफ बोर्डाच्या सूचनेवरून ह्या धंद्यास डिसेंबर, १९५० मध्यें संरक्षण मिळालें. "२५% आयात जकात किंवा डझनावर १ आणा जकात, जी ज्यास्त असेल ती, अधिक काळ्या शिसपेन्सिलींवर २०% सरचार्ज व रंगीत आणि कॉपिंग पेन्सिलींवर ३७·५% सरचार्ज" ह्यांचें तितक्याच संरक्षण जकातींत रूपांतर करण्यांत आलें. पुढें काळ्या शिसपेन्सिलींवरील जकात ०–३–६ करण्यांत आली. संरक्षणाची दोन वर्षांची मुदत संपण्यापूर्वी टारिफ बोर्डाकडून धंद्याची चौकशी करविली गेली नाहीं, म्हणून सरकारनें संरक्षणाची मुदत १९५३ असेर वाढविली. ही चौकशी आतां सुरू आहे. चोरटी आयात, आयातींबाबत सरकारचें उदार धोरण व गिऱ्हाइकांची नावड, ह्या अडचणी कारखानदारांनीं टारिफ बोर्डापुढें मांडल्या आहेत.

### मध्यम वर्गाचें बजेट

मद्रासमधील मध्यम वर्गीयांच्या रहाणीच्या खर्चाची चाचणी मद्रास सरकारचे आर्थिक सल्लागार डॉ. बी. नटराजन ह्यांनीं नुकतीच केली. १०० रु. ते ५९९ रु. दरमहा पगार मिळविणाऱ्या, मद्रास कॉर्पोरेशनच्या प्रोफेशनल टॅक्सला पात्र असणाऱ्या ४०,००० कुटुंबांपैकीं १,३३६ कुटुंबांची पहाणी त्यांत समाविष्ट आहे. त्यांतून निष्कर्ष निघाले, ते असेः—

(१) प्रत्येक कुटुंबांत सरासरीनें ५·८ लोक आहेत.

(२) एकूण कुटुंबांपैकी ६१·९% कुटुंबें "स्वाभाविक कुटुंबें" आहेत, म्हणजे त्यांत कुटुंबप्रमुख, त्याची पत्नी व अविवाहित अपत्यें आहेत.

(३) उत्पन्नवाढीबरोबर कुटुंबांतील घटकांची संख्या वाढत जाते. १०० ते १९९ रु. च्या गटांतील कुटुंबांत सरासरीनें ४·७२ लोक, तर ६०० रु. वरील गटांत ८·७५ लोक आढळतात.

(४) ६१% कुटुंबांचा खर्च उत्पन्नापेक्षा जास्त होतो व ३१% कुटुंबें उत्पन्नांतून बचत करूं शकतात.

(५) १०० ते १९९ रु. ह्या गटांत, उत्पन्न-खर्चांतील प्रतिकूल तफावत सर्वांत अधिक भरते. ह्या गटांतील प्रत्येक कुटुंबाचें सरासरी उत्पन्न १५२ रु. ८ आ., तर खर्च १६९ रु. ३ आ. आहे. सर्व कुटुंबें एकत्र घेतलीं, तर उत्पन्न २८१ रु. व खर्च २८९ रु. ७ आ. आढळतो. सरासरी खर्चांत विमा हप्ता व प्रॉ. फंड (१३ रु. १० आ.) हीं समाविष्ट आहेत.

### राज्यारोहणानिमित्त विम्याचा अवलंब

१९३६ सालीं आठव्या एडवर्डनें राज्यत्याग केल्यामुळें राज्यारोहण होऊं शकलें नाहीं व व्यापाऱ्यांची तयारी फुकट जाऊन त्यांचें नुकसान झालें. राज्यारोहण पुढें ढकललें गेलें किंवा रद्द झालें तरी नुकसान सोसावें लागू नये, म्हणून विमा कंपन्यांकडून कित्येकांनीं विमे घेतले. अशा पॉलिसींची एकूण रक्कम ७ कोटी रुपयांपेक्षा ज्यास्त भरली असावी. राणी एलिझाबेथच्या आयुष्याचा विमा उतरणारे पुष्कळ व्यापारी होते; त्यांना प्रत्येक १०० रु. च्या पॉलिसीसाठीं फक्त १० शिलिंग हप्ता भरावा लागला. कारण, राणी एलिझाबेथच्या मृत्यूचा संभव फारच थोडा होता.

### बँकांच्या कामाचें यांत्रिकीकरण

लॉईड्स बँक लि. चे मि. एच. टी. एन्सर ह्यांनीं इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सच्या गेल्या महिन्यांतील एका सभेंत भाषण करतांना बँकिंगच्या सोई महाग होत जाण्याची भीति व्यक्त केली. चालू खर्च व नोकर वर्गाचे पगार वाढत गेले, तर सामान्य गिऱ्हाइकांवरच त्याचा बोजा असेर पडेल आणि सोईच्या मानानें बोजा वाढला तर तो आपलें बँकेंतील खातें बंदच करील. कंपन्यांचें बँकांवाचून चालणारच नाहीं, परंतु खासगी खातेदारांची गोष्ट वेगळी आहे. भारतांत चेकच्या सवईचा प्रसार अद्याप पुष्कळच व्हावयास पाहिजे. अशा वेळीं बँकिंगच्या सोईत वाढ होणें व त्या सोई अल्प मोबदल्यांत उपलब्ध होणें अगत्याचें आहे. ब्रिटिश बँका आतां यांत्रिक साहित्य, फोटोग्राफी, टेलिव्हिजन, इलेक्ट्रॉनिक्स, इत्यादींचा अधिकाधिक उपयोग करूं लागल्या आहेत. मि. एन्सर ह्यांच्या मतें इलेक्ट्रॉनिक्सच्या उपयोगामुळें बँकांच्या कामांत आमूलाग्र फरक घडून येणार आहे. हिंदी बँका, त्यांचा नोकरवर्ग व त्यांचे गिऱ्हाईक ह्यांना मि. एन्सर ह्यांचा इशारा उद्बोधक वाटेल.

### जागतिक बँकेनें दिलेलीं कर्जें

इंटरनॅशनल बँक फॉर रीकन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंटनें १९४६ पासून आतांपर्यंत १६० कोटी डॉलर्स कर्जाऊ दिले आहेत. त्यांपैकीं ५० कोटी डॉलर्स १९४७ मध्यें फ्रान्स, हॉलंड, लक्सेंबर्ग आणि डेन्मार्क ह्यांच्या पुनरुज्जीवनासाठीं त्यांना देण्यांत आले. उरलेली रक्कम २३ सभासद राष्ट्रांना व तीन स्वतंत्र प्रदेशांना देण्यांत आली. मोठा वांटा (३७·४ कोटी डॉलर्स) लॅटिन अमेरिकेच्या वांट्यास आला. वरील पुनरुज्जीवनाच्या कर्जांसेरीज आणखी २४ कोटी डॉलर्स कर्ज युरोपला मिळालें. मध्य आणि अतिपूर्वेस १८ कोटी, ऑस्ट्रेलियाला १५ कोटी व आफ्रिकेंतील देशांना १४ कोटी डॉलर्स मिळाले.


## बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.

९८० सदाशिव पेठ, पुणें २

# नोटीस

नोटीस देण्यांत येतें कीं, दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटच्या भागीदारांची आठरावी वार्षिक सर्वसाधारण सभा टिळक स्मारक मंदिरांत (टिळक रोड, पुणें नं. २) रविवार ता. २८ जून सन १९५३ रोजीं दुपारीं ३ वाजतां भरविण्यांत येणार असून त्यावेळीं खालील कामांचा विचार होईल.

(१) ता. ३० सप्टेंबर १९५२ असेर संपलेल्या वर्षाबद्दलचा डायरेक्टर्स यांचा अहवाल व ऑडिटर्स यांनीं तपासून बरोबर असा शेरा मारलेला ताळेबंद व नफातोटापत्रक स्वीकारणें.

(२) निवृत्त होणाऱ्या डायरेक्टरांचे जागीं डायरेक्टर्स निवडणें. (निवृत्त होणारे डायरेक्टर्स फेर-निवडणुकीस पात्र आहेत.)

(३) चालू वर्षाकरितां ऑडिटर्स नेमणें व त्यांचा मेहनताना निश्चित करणें.

पुणें नं. २
ता. ६ जून
१९५३

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांचे हुकुमावरून
सी. जी. आगाशे अँण्ड को.
मॅनेजिंग एजण्टस्.

सूचनाः— कंपनीचीं शेअर ट्रॅन्स्फर बुकें ता. ६ जून १९५३ ते ता. ५ जुलै १९५३ असेर (दोन्ही दिवस धरून) बंद राहतील.

### शेरपा तेनसिंग

मौंट एव्हरेस्ट शिखर पादाक्रांत करणारा पहिला मनुष्य, शेरपा तेनसिंग, हा ३९ वर्षांचा आहे. त्याचा जन्म नेपाळमध्यें झालेला असला तरी १९३३ पासून तो भारताचाच रहिवासी आहे. त्याची पत्नी व त्याच्या दोन मुली ह्यांचा जन्म भारतांतच झालेला आहे. तो बुद्धधर्मीय आहे. तो धूम्रपान करीत नाहीं व मद्यपानाचें त्यास व्यसन नाहीं, परंतु त्याला कॉफी अतिशय आवडते. दार्जीलिंगमध्यें तेनसिंगाचें कुटुंब एक टिनच्या पत्र्याचें छप्पर असलेल्या एका लाकडी घरांत रहातें. तेनसिंग हा शेरपा बोलीप्रमाणें नेपाळी, येल्मो, हिंदुस्थानी, पुस्तु, चित्राळी, तिबेटी (उत्तर व दक्षिण दोन्ही बोली) ह्या भाषांत बोलूं शकतो. त्याला इंग्रजी समजतें व कामापुरतें बोलतांहि येतें.

---

### पू. पाकिस्तानांतील १२५ चित्रपटगृहांस टाळा

दाखविण्यास फिल्म्सच नाहींत, म्हणून पूर्व पाकिस्तानांतील सर्व सिनेमागृहें १७ जुलैपासून अनिमुदत बंद रहाणार आहेत. ६ ऑगस्ट, १९५२ पासून हिंदी फिल्म्सची पाकिस्तानांत आयात बंद करण्यांत आली, तेव्हांपासूनच तेथील सिनेमागृहांना अडचण भासूं लागली. पश्चिम पाकिस्तानांत दरसाल थोडेतरी चित्रपट तेथील चार स्टूडिओंत तयार होतात, परंतु पूर्व-पाकिस्तानांत चित्रपटनिर्मितीचा अभाव आहे. पूर्व पाकिस्तानांत बंगाली चित्रपटांस मोठी मागणी आहे, पण हे चित्रपट कलकत्ता येथूनच आणावे लागतात. जुन्या फिल्म्स दाखवीत बसणें फार नुकसानीचें होत आहे आणि पाकिस्तान सरकारनें ह्या प्रश्नाकडे लक्ष अद्याप पुरविलेलें नाहीं. म्हणून, १२५ चित्रपटगृहांवर टाळाबंदीची पाळी आली आहे.

---

### शेठ प्राणलाल ह्यांची पूना बँकिंग असोसिएशनला भेट

शनिवार, ता. ६ रोजीं शेठ प्राणलाल देवकरण नानजी ह्यांनीं पूना बँकिंग असोसिएशनला भेट दिली आणि संस्थेच्या कार्याचा गौरव करून तिला १०१ रु. ची देणगी दिली. नोव्हेंबर, १९५२ अखेर असोसिएशननें बँकिंग प्रदर्शन भरविलें होतें, त्यावेळींहि शेठ प्राणलाल ह्यांनीं २५१ रु. ची देणगी दिली होती. महाराष्ट्र बँकेच्या नव्या इमारतीसहि ता. ६ रोजीं त्यांनीं भेट दिली, त्या प्रसंगीं त्यांनीं लक्ष्मीची प्रतिमा असलेलें चांदीचें सुबक पेपरवेट मॅनेजरच्या टेबलावर ठेवण्यासाठीं बँकेला नजर केलें.

---

### अमेरिकेच्या स्वतःच्या हितासाठीं पाकिस्तानला मदत

अमेरिका पाकिस्तानला १० लक्ष टन गव्हाची देणगी देणार आहे. "पाकिस्तानची शक्ति वाढविणें अमेरिकेच्या फायद्याचें आहे. उपाशी राष्ट्राची शक्ति टिकणें अशक्य आहे. परतफेडीचें कर्ज पाकिस्तानाची आर्थिक परिस्थिति बिघडवील, आणि अमेरिकेचें हित तर पाकिस्तानाला बलवान् करण्यांत आहे. म्हणून १० लक्ष टनांची देणगीच इष्ट होय" असें सेक्रेटरी ऑफ स्टेट, मि. जॉन फॉस्टर डलेस, ह्यांनीं प्रस्तुत देणगीचें समर्थन केलें आहे.

---

### मेट्रिक वजनांची ग्रेट ब्रिटनमध्यें सरशी

ग्रेट ब्रिटनमधील औषधाच्या धंद्यांत आतां ग्रेन्स व ड्राम्स ऐवजीं मेट्रिक वजनें वापरण्यांत येणार आहेत. जुलैपासून हा बदल अंमलांत येईल, असें समजतें. मेट्रिक पद्धतीचीं वजनेंच बहुतेक शास्त्रीय शास्त्रांतून जगभर वापरलीं जातात.

### "नंतरची सकाळ"

राणी इलिझाबेथच्या राज्यारोहणाच्या दुसऱ्याचें दिवशीं मँचेस्टर गार्डियन ह्या ब्रिटिश वृत्तपत्रानें डेव्हिड लो ह्यांचें "नंतरची सकाळ" ह्या शीर्षकाखालचें एक व्यंगचित्र प्रसिद्ध केलें. राज्यारोहणाच्या निमित्तानें झालेल्या समारंभास "१०,००,००,००० पौंडांची बेजबाबदार उधळपट्टी" असें डेव्हिड लो नें म्हटलें आणि प्रत्यक्ष गंभीर परिस्थितीची उद्या जाणीव झाली म्हणजे लोकांना पश्चात्ताप होईल असें त्यानें सुचविलें आहे. ह्या व्यंगचित्राविरुद्ध बरीच ओरड झाली, तेव्हां "मँचेस्टर गार्डिअन" नें वाचकांचीं मनें दुखविण्याचा त्याचा उद्देश नव्हता हें स्पष्ट केलें. परंतु "ह्या कटु सत्यास आपणांस टाळतां येणार नाहीं." असेंहि त्यांस बजावलें. "आपल्या चढीच्या मार्गावरील वाटचालींत राज्यारोहणाच्या वातावरणामुळें खंड पडला आणि त्याचें कटु फळ आपणांस भोगावें लागेलच" हें त्या वृत्तपत्रानें सांगून टाकलें. "नंतरची सकाळ" ह्या शीर्षकानें आधींच्या रात्रीं अनिर्बंधपणें बेफाम चैन करण्यांत आली होती व त्यासाठीं कृत्रिम उत्तेजकांची आवश्यकता होती, असें ध्वनित केलें जातें. डेव्हिड लो च्या व्यंगचित्राचा अर्थ स्पष्ट आहे.

---


**ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड, ओगलेवाडी**

## नोटीस.

वरील कंपनीच्या भागीदारांची बत्तिसावी वार्षिक साधारण सभा ओगलेवाडी येथील कंपनीच्या रजिस्टर्ड ऑफिसमध्यें रविवार ता. ५ जुलै १९५३ रोजीं दोन प्रहरीं ३-३० वाजतां खालील कामकाजांचा विचार करणेसाठीं भरणार आहे.

(१) डायरेक्टर्स यांनीं केलेला रिपोर्ट व ता. ३१-१२-५२ अखेरचा हिशोब-तपासनिसांनीं तपासलेला ताळेबंद व नफा-तोटापत्रकें स्वीकारून त्यास मंजुरी देणें.

(२) आर्टिकल्स ऑफ असोसिएशन कलम १०६ प्रमाणें शेठ चतुरभाई पीतांबरदास शहा, श्रीमंत श्रीजगन्नाथमहाराज पंडीत व धर्मप्रकाश एल. एस्. वेंकाजीराव हे बोर्ड ऑफ डायरेक्टर्सवरील आपल्या जागा सोडीत असून त्यांचे जागीं तीन डायरेक्टर्सची निवड करावयाची आहे. जागा सोडणारे डायरेक्टर्स पुन्हां निवडून येण्यास पात्र असून ते त्या जागांसाठीं उभे आहेत.

(३) इंडस्ट्रिअल फायनान्स कार्पोरेशन ऑफ इंडिया यांचेकडून दि म्हैसूर ग्लास अँड एनॅमल वर्क्स लि. बंगलोर यांना मंजूर झालेल्या लोनबाबत स्पेशल ठरावांना मान्यता देणें.

(४) चालू सालासाठीं ऑडिटर्स नेमून त्यांचा मुशाहिरा ठरविणें.

कंपनीचीं शेअर ट्रॅन्स्फर बुकें ता. १८ जून ते ५ जुलै १९५३ अखेर (दोन्ही दिवस धरून) बंद राहतील.

ओगलेवाडी
जि. उ. सातारा
ता. २६ एप्रील ५३

बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे हुकुमावरून,
एस्. पी. ओगले आणि कं.
मॅनेजिंग एजंटस्.

---

सूचना:—ठराव नंबर ३ (२) मधील ड्रिपार्टाइट कराराचा मसुदा कंपनीच्या रजिस्टर्ड ऑफिसांत कामाचे दिवशीं सकाळीं ८ ते १२ व दोन प्रहरीं १ ते ५ वेळेंत पहाणेस ठेवला आहे.

आपल्या पत्त्यांत कांहीं फेरबदल झाल्यास तो कृपा करून कंपनीकडे सत्वर कळवावा.

## भारत–तुर्कस्तान व्यापारी करार

भारत आणि तुर्कस्तान ह्या देशांनीं आपसांत एक व्यापारी करार नुकताच केला आहे. उभयता देशांचे आयात-निर्यात विषयक जे नियम असतील त्यांना धरून शक्य तितके अधिक व्यापाराचे परवाने देण्याचे परस्परांनीं ठरविलें आहे. १९५२–५३ सालीं भारतानें तुर्कस्तानला ५ कोटी रुपये किंमतीचा माल निर्यात केला. उलटपक्षीं, तुर्कस्ताननें भारताला ८३,००० रुपये किंमतीचा माल निर्यात केला. भारताकडून तुर्कस्तानला काथ्याचे दोर व इतर वस्तु, औषधें, रंगासाठीं लागणारा माल, मिरी, चहा, तागाच्या वस्तू आणि लाख इत्यादी वस्तू निर्यात केल्या जातात. तुर्कस्तान भारताला रासायनिक द्रव्यें आणि सुकी फळें पाठवितो. तुर्कस्तान भारताला पुढीलप्रमाणें वस्तू पाठविणार आहे. सुकी फळें, कमी प्रतीचीं धान्यें व डाळी, वाटाणे, रेशमी सूत व कोशिंब्या, कापूस आणि पारा. भारत तुर्कस्तानला पुढील वस्तू पाठविणार आहे. चहा, तागाच्या वस्तू, काथ्याचे दोर व इतर पदार्थ, मोटारींच्या टायर्स व ट्यूब्स, रबराच्या वस्तू– उदा. शेकण्याच्या रबरी पिशव्या, रबराचे कापड, मसाल्याचे पदार्थ, औषधें एरंडेलाचें तेल, व कापड. ह्या वस्तुंशिवाय इतर वस्तूंची देवघेव व व्यापार होणार नाहीं, असें मात्र नाहीं. दोन्ही देशांनी परस्परांत बोटींची वाहतूक करण्यालाही उत्तेजन देण्याचें ठरविलें आहे. ह्या करारावर तुर्कस्तानचे भारतामधील वकील आणि भारत सरकारच्या व्यापार व उद्योग खात्याचे संयुक्त चिटणीस श्री. भूतलिंगम ह्यांनी सह्या केल्या आहेत. भारतामधील पक्क्या अगर कच्च्या मालाची जवळची व नैसर्गिक बाजारपेठ म्हणजे आग्नेय आशिआंतील राष्ट्रें आणि मध्य पूर्वेतील राष्ट्रें हीच होय. भारताच्या आसपास असणाऱ्या ह्या राष्ट्रांमधूनच भारताला निर्यात–व्यापार करणें सोईचें आहे.

---

## नवें हिंदी व्यापारविषयक नियतकालिक

जनतेची, विशेषतः व्यापारीवर्गाची, मागणी लक्षांत घेऊन मध्यवर्ती व्यापार व उद्योग खात्यानें उद्योग–व्यापार पत्रिका या नांवाचें एक हिंदी मासिक अधिकृतरीत्या प्रकाशित करण्याचें ठरविलें आहे. या मासिकाचा पहिला अंक जून, १९५३ मध्यें प्रसिद्ध होईल. सरकार प्रसिद्ध करीत असलेलें हें पहिलें व एकमेव हिंदी व्यापारविषयक नियतकालिक आहे.

चालू आर्थिक व व्यापारी बाबींवरील खास लेखांशिवाय या नियतकालिकांत उद्योगधंदे, व्यापारनियंत्रणें, व्यापारवाढ, घरगुती आणि लहान प्रमाणावरील उद्योगधंदे, नियोजन आणि विकास, या क्षेत्रांतील दैनंदिन घटना देणारा एक माहिती–विभागहि असेल. दुसऱ्या एका विभागांत भारतांतील सर्वसाधारण आर्थिक परिस्थितीचें वृत्त देण्यांत येईल. तसेंच परकीय वृत्त विभागांत इतर देशांतील व्यापार व वस्तुविषयक माहिती सादर करण्यांत येईल.

या नियतकालिकांत एक आलेख देणारा व एक आंकडेवारी विभाग राहील. या विभागांत परकीय व्यापार आणि औद्योगिक उत्पादन यासंबंधींचे ताजे आंकडे व भारतीय मालाच्या किंमती देण्यांत येतील.

तसेंच या नियतकालिकांत आयात–निर्यात व्यापार नियंत्रणें, औद्योगिक नियंत्रणें, कर, इत्यादिसंबंधींच्या महत्त्वाच्या सरकारी घोषणा व परिपत्रकें यांचें हिंदी भाषांतर देण्यांत येईल.

## बॉंबे ॲग्रि. डेटर्स रिलीफ ॲक्टाची अंमलबजावणी

(१९५०–५१)

शेतकऱ्यांचीं कर्जें त्यांच्या परतफेडीच्या मर्यादेंत आणणें, त्यांची जमीन वांचवणें आणि त्यांचें शेत–मजुरांत होणारें रूपांतर टाळणें हा वरील कायद्याचा मुख्य हेतु आहे. एकूण १४,९०,२४९ कर्जदारांनीं व धनकोंनीं १९५१ अखेर कर्ज तडजोडीसाठीं अर्ज केले त्यांत ३०,५८,३३,३३५ रु. चें कर्ज अंतर्भूत होतें आणि तें १२,६६,४७,६६७ रुपयांनीं कमी करण्यांत आलें. १९४२ मध्यें कायदा झाला तेव्हांपासून १९५१ अखेरचे आंकडे खालीं दिले आहेत. १९५०–५१ मध्यें ८०,४३५ अर्ज आले, त्यांत १२,२७,२३,००५ रु. चें पैशाच्या स्वरूपांत देणें होतें व ९९,७८,४६७ रुपयांच्या कर्जांत गहाणाचे व्यवहार होते. कोर्टाकडे न जातां आपसांत तडजोड करण्याची प्रवृत्ति ऋणकोंत व धनकोंत वाढली असल्याचें दिसून आलें.

| | संख्या | रक्कम रु. |
|---|---|---|
| १ कर्जदार व धनको ह्यांचेकडून आलेल्या अर्जांची संख्या | १४,९०,२४९ | ३०,५८,३३,३३५ |
| २ त्यांनीं काढून घेतलेल्या अर्जांची संख्या | ६०,७२१ | ... |
| ३ निकालांत काढलेल्या अर्जांची संख्या | ७,७०,०८० | ३२,२१,०८,७५१ |
| ४ किती रकमेनें कर्ज कमी झालें | ... | १२,६६,४०,६६७ |
| ५ लँड मॉर्गेज बँकांनीं घेतलेले हुकूमनामे | ७७० | ३,९७,२१३ |
| ६ हुकूमनाम्यानंतर केलेलीं अपिलें | ४,६८८ | ... |

---

## हिंदी स्टँडर्ड टाइपरायटर

१९४८ सालीं घटना समितीच्या अध्यक्षांनीं श्री. काकासाहेब कालेलकर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमून तिच्याकडे हिंदी टाइपरायटरच्या बटनांची रचना सुचविण्याचें काम सोपविलें होतें. कमिटीनें हिंदी टाइपरायटरला ४६ बटनें असावींत व त्यावर ९४ अक्षरें असावींत असें सुचविलें आहे. पोर्टेबल टाइपरायटरवर ४२ बटणें व ८४ अक्षरें असावीत अशीहि कमिटीची सूचना आहे.

---

## गो. स. पारखे औद्योगिक मान–पारितोषिकें

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीजतर्फे प्रतिवर्षी देण्यांत येत असलेल्या गो. स. पारखे औद्योगिक मान–पारितोषिकांसाठीं यंदा आलेल्या विविध वस्तूंचें पारितोषिक समितीनें परीक्षण करून अहमदनगर येथील श्री. ग. स. तासकर यांच्या सी. एम. ई. एंजिनियरिंग कॉर्पोरेशननें बनविलेल्या हॅण्ड स्क्वीझ मोल्डिंग मशीनला रु. १५० चें पारितोषिक देण्याची शिफारस केली आहे; तसेंच ठाणा कॅण्डल फॅक्टरीनें बनविलेल्या मेणबत्त्यांना रु. ५० चें जादा बक्षिसहि गृहोद्योगास उत्तेजनार्थ म्हणून देण्यांत येणार आहे. हा मेणबत्त्यांचा कारखाना सौ. सरस्वतीबाई जोशी या महिलेनें काढलेला आहे. पारितोषिकें देण्याचा समारंभ मंगळवार दि. १६ जून १९५३ रोजीं सायंकाळीं चेम्बरच्या ओगले स्मारक सभागृहांत मुंबई राज्य औद्योगिक सल्लागार समितीचे सभासद, भातगिरण्यांचे सुप्रसिद्ध कारखानदार, जी. जी. दांडेकर मशीन वर्क्सचे श्री. गो. ग. उर्फ दादासाहेब दांडेकर, ह्यांच्या हस्तें झाला.

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५१। आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.